

संत सेवालाल महाराज
जयंतीनिमित्त हार्दिक शुभेच्छा!

दैनिक

# अट्टल संकेत

ATTAL SANKET

Email : attalsanket2023@gmail.com

RNI No. MAHMAR/2023/87816

दैनिक ▪ छत्रपती संभाजीनगर ▪ वर्ष-२ ▪ अंक-२९५ ▪ शनिवार, दि. १५ फेब्रुवारी २०२५ ▪ पाने ४ ▪ किंमत २ रूपये

Daily ▪ Chhatrapati sambhajinagar ▪ Vol.2 ▪ Issue -295 ▪ Saturday, 15 Feb 2025 ▪ Pages-4 ▪ Price- 2/-


## गतिमान आणि प्रगतिशील कायदा-सुव्यवस्था उभी करणार

### केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यासोबत मुख्यमंत्री फडणवीस यांची बैठक

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी नवीन फौजदारी कायद्यासंदर्भातील महाराष्ट्रातील अंमलबजावणीचा आढावा घेतला. या तीन कायद्यांच्या अंमलबजावणीतून राज्यात गतिमान आणि प्रगतिशील कायदा-सुव्यवस्था उभी करणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या बैठकीनंतर माध्यमांशी संवाद साधताना सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याकडे तीन नवीन कायद्यांच्या संदर्भात आढावा बैठक झाली. या कायद्यांची राज्यात अंमलबजावणी कशा पद्धतीने होते आहे, त्यासाठी निर्माण करावयाच्या संस्थात्मक आणि पायाभूत सुविधांची स्थिती काय आणि किती प्रकरणे दाखल झाली याचा आढावा या बैठकीत घेण्यात आला. भारतीय न्यायसंहिता, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता आणि भारतीय साक्ष संहिता असे हे




तीन कायदे आहेत. या बैठकीत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी महाराष्ट्राचा आढावा घेतला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्रात तिन्ही कायद्यांची अंमलबजावणी अतिशय चांगल्या पद्धतीने सुरू आहे. २७ मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन रुजू झाल्या असून, पुढच्या ६ महिन्यांत संपूर्ण नेटवर्क तयार होईल. ज्या गुन्ह्यात ७ वर्षांपेक्षा जास्त शिक्षा आहे, अशा प्रकरणात आता मोबाईल फॉरेन्सिक व्हॅनच्या माध्यमातून घटनास्थळीच न्यायवैद्यकीय परीक्षण केले जाणार आहे. यातून गुणवत्तापूर्ण पुरावे उपलब्ध होणार आहेत. राज्य पोलीस दलाच्या २ लाखांच्या फोर्सपैकी ९० टक्के प्रशिक्षण पूर्ण झाले असून, उर्वरित १० टक्के प्रशिक्षण ३१ मार्चपूर्वी पूर्ण करण्याचा प्रयत्न आहे. आरोपींना वारंवार कोर्टात हजर करावे लागू नये, यासाठी नवीन कायद्यान्वये कारागृहात साक्षीसाठी क्युबिकल्स उभे करून ते न्यायालयाशी ऑनलाईन जोडून देण्यात येणार आहेत.

प्रत्येक कोर्टाचे विशिष्ट क्युबिकल असणार आहेत. ६ ते ८ महिन्यांत हेही काम आम्ही पूर्ण करणार आहोत. पोलीस वाहन, सुरक्षेवरील ताण आणि न्यायालयातील गर्दी यामुळे कमी होणार आहे. नवीन कायद्यानुसार, वारंवार न्यायालयात तारखा मागता येणार नाही, याची तरतूद असल्याने सरकारी वकिलांना त्याचे प्रशिक्षण द्यावे लागणार आहे. अतिशय चांगले मार्गदर्शन बैठकीत मिळाले असून हे तिन्ही कायदे लागू करण्यासंदर्भात अधिक वेगाने आम्ही काम करू, असे फडणवीस यांनी सांगितले.

### तहव्वूर राणा आहे कोण?

२६/११ चा अपराधी तहव्वूर राणा याच्या प्रत्यार्पणासाठी अमेरिकेने होकार दिला, यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा मी अतिशय आभारी आहे. आम्ही गेल्यावेळी तहव्वूर राणाची ऑनलाईन साक्ष घेतल्यानेच या प्रकरणात पाकिस्तानचा सहभाग सिद्ध झाला. मुंबईवरील हल्ल्याच्या घटनेत अंतिम न्यायाची वेळ आता आली आहे. हा खटला मुंबईत चालणार असल्याने त्याला मुंबईतच आणले जाणार आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. राणाला मुंबईतील कारागृहात ठेवण्यासाठी सुरक्षा व्यवस्था आहे का, असा प्रश्न पत्रकारांनी विचारला असता मुख्यमंत्री म्हणाले, कसाबला आम्ही मुंबईतील जेलमध्ये ठेऊ शकतो, तर तहव्वूर राणा आहे कोण?

## रात्री १२ वाजता वसंतराव नाईक चौक सिडको येथे संत सेवालाल महाराजांच्या जन्मोत्सवास प्रारंभ

### फटाक्यांची आतिषबाजी; २८६ दिवे लावल्याने परिसर उजळला

रात्री १२.३० पर्यंत चालला जल्लोष




**छत्रपती संभाजीनगर**

रात्री १२ वाजता वसंतराव नाईक चौक सिडको येथे थोर सम ाजसुधारक बंजारा समाजाचे आराध्य दैवत संत सेवालाल महाराजांच्या जन्मोत्सवास प्रारंभ करण्यात आला. २८६ वी जयंती असल्याने राज राठोड यांच्या अध्यक्षतेखाली मित्रमंडळींनी २८६ दिवे लावून वसंतराव नाईक चौकात दीपोत्सव साजरा केला. रात्री १२ वाजेच्या ठोक्यास आतषबाजीही करण्यात आली. तसेच संत सेवालाल महाराजांच्या नावाचा जयघोषही करण्यात आला.जयंतीदिनी भक्तीगीतांचा कार्यक्रम देखील आयोजित करण्यात आल्याचे राज राठोड यांनी सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्ष राठोड राठोड, कार्यक्रमाचे संयोजक प्रशांत राठोड तसेच हा कार्यक्रम सविस्तरपणे आयोजित केला आहे. ते म्हणजे आयोजन राज राठोड. यांनी सर्व समाजबांधवांच्या जयंती निमित्त शुभेच्छा दिल्या. तसेच सामाजिक कार्यासाठी आपण अजून मोठ्या ताकदीने उभे राहू असे सांगितले.

## मोदी माझ्यापेक्षाही चांगले वाटाघाटीकार; अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याकडून पंतप्रधानांची प्रशंसा

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

डोनाल्ड ट्रम्प दुसऱ्यांदा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष झाल्यानंतर पहिल्याच अमेरिकेच्या दौऱ्यावर असलेले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भेटीच्या पहिल्या दिवशी ट्रम्प प्रशासनाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची भेट घेतली. या बैठकांची मालिका अमेरिकन गुप्तचर सेवा संचालक तुलसी गॅबार्ड यांच्याशी सुरू झाली आणि त्यानंतर पंतप्रधान मोदींनी अमेरिकेचे सुरक्षा सल्लागार मायकेल वॉल्ट्झ यांची भेट घेतली, ज्यांना भारताचे मित्र मानले जाते. पंतप्रधान मोदींनी राष्ट्र ाध्यक्ष ट्रम्प यांची व्हाईट हाऊसमध्ये भेट घेतली. या दरम्यान झालेल्या द्विपक्षीय चर्चेमध्ये अनेक करार करण्यात आल्याची माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली आहे. संयुक्त निवेदनादरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांना भारत भेटीचे आमंत्रण दिले.

व्हाईट हाऊसमध्ये द्विपक्षीय चर्चेनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेतली, जिथे त्यांनी दोन्ही देशांमधील महत्त्वाच्या करारांची माहिती दिली आणि पत्रकारांच्या अनेक प्रश्नांची उत्तरे दिली. पंतप्रधान म्हणाले की, २०३० पर्यंत आपण भारत-अमेरिका व्यापार दुप्पट करू. त्याच वेळी, ट्रम्प यांनी पंतप्रधान मोदींना स्वतःपेक्षा चांगले वाटाघाटीकार म्हणून वर्णन केले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यात व्हाईट हाऊसमध्ये चर्चा झाली. पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, रशिया आणि युक्रेनमधील लढाईचा विचार केला तर. राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी पुतिनशी बोलणे केले आहे. जगाचा दृष्टिकोन असा आहे की भारत तटस्थ आहे, पण मी तुम्हाला सांगतो की भारत तटस्थ नाही, भारताची स्वतःची बाजू शांतता आहे.

पुढे बोलताना अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प म्हणाले की, मला हे जाहीर करताना आनंद होत आहे की माझ्या प्रशासनाने कट रचणाऱ्यांपैकी एक (तहव्वुर राणा) आणि भारतात न्यायाला सामोरे जाणाऱ्या जगातील सर्वात वाईट व्यक्तींपैकी एकाच्या प्रत्यार्पणाला मान्यता दिली आहे. २००८ च्या मुंबईवरील भयानक दहशतवादी हल्ल्याशी त्याचा संबंध आहे. तो न्यायाला सामोरे जाण्यासाठी भारतात परत जात आहे.

## मुख्यमंत्री फडणवीसांनी सहकुटुंब केले त्रिवेणी संगमात स्नान



**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज, शुक्रवारी प्रयागराज येथे आयोजित महाकुंभमेळ्यात पोहोचले. यावेळी त्यांनी सहकुटुंब त्रिवेणी संगमात पवित्र स्नान केले. मुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रयागराजच्या अरैल घाटावर जाऊन त्यांनी संगमात आस्थेची पवित्र डुबकी घेतली. प्रयागराजमधील कुंभमेळ्यात मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासह त्यांच्या पत्नी अमृता फडणवीस, आई सरीता फडणवीस आणि मुलगी दिवीजा फडणवीस यांनीदेखील त्रिवेणीच्या संगमात पवित्र स्नान केले. यावेळी मुख्यमंत्री म्हणाले की, तब्बल १४४ वर्षांनंतर होणाऱ्या तीर्थराज प्रयागच्या महाकुंभाच्या भव्य समारंभाची व्यवस्था. मुख्यमंत्री योगीजी यांच्या सरकारची ही एक मोठी कामगिरी आहे, एक हिंदू म्हणून मीही येथे पवित्र स्नान करण्यासाठी आल्याचे फडणवीस यांनी आपल्या ट्विटर (एक्स) पोस्टमध्ये नमूद केले आहे.

## सिझेरियनवेळी निष्काळजीपणामुळे रुग्ण महिलेची त्वचा जळाली; डॉक्टरांविरोधातील गुन्हा रद्द करण्यास न्यायालयाचा नकार

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

येथील एका मॅटरनिटी होममध्ये सिझेरियन शस्त्रक्रियेवेळी डॉक्टरांच्या निष्काळजीपणा मुळे एका महिलेच्या पोटाजवळील भाग, दोन्ही मांड्या आणि जननेंद्रियाजवळील त्वचा मोठ्या प्रमाणात जळाली. जखमी महिलेने बर्न स्पेशालिस्टकडे पाठवण्याची विनंती केली होती, मात्र डॉक्टरांनी तिला स्वतःच्या रुग्णालयातच उपचारासाठी ठेवले. या प्रकरणी महिलेच्या तक्रारीवरून डॉक्टरांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. संबंधित डॉक्टरांनी हा गुन्हा रद्द करण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल केली होती. मात्र, न्यायालयाने गुन्हा रद्द करण्यास नकार देत डॉक्टरांवर खटला चालवण्यास परवानगी दिली.

२३ ऑक्टोबर २०२२ रोजी एक विवाहिता डॉ. प्रतिभा पुलकेशी कुलकर्णी यांच्या चैतन्य मॅटरनिटी अँड नर्सिंग होम, आकाशवाणी चौक, छत्रपती संभाजीनगर येथे सिझेरियनसाठी भरती झाली होती. शस्त्रक्रियेवेळी वापरण्यात आलेल्या कॉट्री मशीनचा निष्काळजीपणे वापर झाल्यामुळे महिलेच्या पोटाच्या आसपासचा भाग, दोन्ही मांड्या आणि जननेंद्रियाजवळील त्वचा मोठ्या प्रमाणात जळाली.

ही दुखापत झाल्यानंतर महिलेने तिला बर्न स्पेशालिस्टकडे रेफर करण्याची विनंती केली, मात्र डॉक्टरांनी तिच्यावर स्वतःच उपचार सुरू ठेवले आणि बर्न स्पेशालिस्टला देखील रुग्णालयात बोलावले नाही. त्यामुळे महिलेने २ नोव्हेंबर २०२२ रोजी जिन्सी पोलिस स्टेशनमध्ये डॉक्टरांविरोधात तक्रार दाखल केली. तपासादरम्यान पोलिसांनी महिलेच्या उपचाराचे कागदपत्रे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात पाठवले. घाटी रुग्णालयातील 'वैद्यकीय निष्काळजी समितीने' अहवाल सादर करत डॉक्टरांच्या निष्काळजीपणाची पुष्टी केली. त्यानंतर २६ सप्टेंबर २०२३ रोजी जिन्सी पोलिस ठाण्यात डॉक्टरांविरोधात भारतीय दंड संहितेच्या कलम ३३६ आणि ३३७ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आणि प्रथमवर्ग न्यायदंडाधिकाऱ्यांच्या न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले. डॉ. प्रतिभा कुलकर्णी यांनी या गुन्ह्याविरोधात मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल केली होती. त्यांच्याविरोधातील गुन्हा चुकीचा असल्याचे सांगत तो रद्द करण्याची मागणी केली. सरकार पक्षातर्फे सहाय्यक सरकारी वकील रश्मी गौर सबनीस आणि पीडितेच्या वतीने अॅड. संदीप बी. राजेभोसले यांनी न्यायालयात युक्तिवाद केला. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायमूर्ती विभा कंकणवाडी आणि न्यायमूर्ती एस. ए. देशमुख यांच्या खंडपीठाने डॉक्टरांविरुद्धचा गुन्हा रद्द करण्यास नकार दिला. त्यानंतर डॉक्टरांनी आपली याचिका मागे घेतली.

सुनावणीदरम्यान, पीडित महिलेच्या उपचाराचे मूळ कागदपत्रे तपास अधिकाऱ्यांनी जप्त न करता ती डॉक्टरांकडेच राहिल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आले. तपास अधिकाऱ्यांनी केवळ कागदपत्रांच्या छायांकित प्रतीच जप्त केल्या होत्या. त्यामुळे न्यायालयाने तपास अधिकाऱ्यांना हजर राहण्याचे निर्देश दिले. तपास अधिकाऱ्यांनी न्यायालयात हजर राहून शपथपत्र सादर केले आणि झालेल्या चुकांसाठी माफी मागितली. तसेच भविष्यात अशा त्रुटी टाळण्याचे आश्वासन दिले.

## पिग्मी एजंटचा क्रेडिट सोसायटीस ६ लाखांचा गंडा

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

क्रेडिट सोसायटीच्या पिग्मी एजंटने सभासदांकडून जमा केलेली रक्कम स्वतःच्या कामासाठी वापरली. यात शांतीश्वर अर्बन को ऑप. क्रेडिट सोसायटीमध्ये तब्बल ६ लाख १८ हजार ४५० रुपयांचा अपहार झाले असल्याचे उघडकीस आले आहे. हा प्रकार ३ नोव्हेंबर ते ६ डिसेंबर २०२४ या कालावधीत घडला आहे. याप्रकरणी धिरज कल्याण चव्हाण (२८, रा. प्लॉट नं. ५०, मुकुंदनगर, मुकुंदवाडी) याच्यावर सिडको पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यात पवन पंडीत चव्हाण (३०, रा. जामवाडी, पो. आडूळ, ता.पैठण) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, आरोपी दोन वर्षांपासून शांतीश्वर अर्बन को. ऑप. क्रेडिट सोसायटी लि. येथे शाखा व्यवस्थापक म्हणून कार्यरत आहे. प्रत्येक महिन्याच्या १ ते ६ तारखेदरम्यान शाखेत सर्व पिग्मी एजंटचे पासबुक तपासले जाते. ६ डिसेंबरला धीरज चव्हाणचे याच्याकडील सभासद खय्युम उस्मान शेख यांचे पासबुक तपासत असताना नोव्हेंबर २०२४ मध्ये जमा केलेल्या रकमेपैक्षा भरणा केलेली रक्कम कमी असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर धीरज चव्हाणकडील सर्व पासबुक तपासल्यावर ६ लाख १८ हजार ४५० रुपयांचा घोटाळा उघड झाला. यात आरोपी धिरजने सर्व घोटाळा केल्याचे मान्य केले. वैयक्तिक कामासाठी हा अपहार केला. मात्र दोन दिवसात हे सर्व पैसे भरतो, माझ्यावर गुन्हा दाखल न करण्याची त्याने विनंती केली. आपलाच कर्मचारी असल्याने पवन यांनी विश्वास ठेवत त्यास मुदत दिली. मात्र त्याने दोन दिवसात पैसे न भरत पुन्हा एकदा विश्वास मोडला. त्यामुळे अखेर सिडको पोलिस ठाणे गाठत त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# आव्हान मुलांच्या 'होरपळी'चे

युनायटेड नेशन्स चिल्ड्रन्स फंड (युनिसेफ) च्या 'लर्निंग इंटरप्टेड: ग्लोबल स्नॅपशॉट ऑफ क्लायमेट-रिलेटेड स्कूल डिसप्शन इन २०२४' या अहवालातील धक्कादायक निष्कर्षांमुळे मुलांबद्दलची चिंता वाढली आहे. गेल्या वर्षी एकट्या भारतात सुमारे पाच कोटी विद्यार्थ्यांना उष्णतेच्या लाटा आणि अति उष्णतेचा फटका बसला होता, असे हा अहवाल सांगतो. आतापर्यंत, जागतिक तापमानवाढीचा शेती आणि हवामान चक्रावर होणाऱ्या परिणामांचे अभ्यास निष्कर्ष समोर येत होते; परंतु मुलांच्या शारीरिक, मानसिक, भावनिक, शैक्षणिक आणि आरोग्यविषयक समस्यांवर हवामान बदलाचा इतका संवेदनशील अभ्यास पहिल्यांदाच समोर आला आहे. यामुळे पालक आणि शिक्षणतज्ज्ञांमध्ये चिंता निर्माण झाली आहे. हवामान बदलाचे मुलांवर आणि शिक्षणावर होणारे हानिकारक परिणाम कमी करण्यासाठी प्रभावी धोरणे बनवण्याची आणि त्यांची त्वरित अंमलबजावणी करण्याची सरकारची जबाबदारी या अहवालामुळे वाढली आहे.

हवामान बदलाच्या बाबतीत भारताला अत्यंत संवेदनशील देश म्हणून घोषित करण्यात आले आहे. युनिसेफच्या अहवालानुसार, २०२४ मध्ये जगातील ८५ देशांमधील २४.२ कोटी मुलांचे शिक्षण अतिवृष्टीमुळे विस्कळीत झाले. प्रभावित विद्यार्थ्यांपैकी ७४ टक्के विद्यार्थी हे कमी आणि निम्न-मध्यम-उत्पन्न असलेल्या देशांमध्ये असून त्यांचा सरासरी बाल हवामान जोखीम निर्देशांक (सीसीआरआय) १० पैकी ७ आहे. ८५ देश-प्रदेशांमधील शाळा हवामान धोक्यांमुळे प्रभावित झाल्याचे या अहवालातून दिसून आले आहे. तसेच २३ देशांमध्ये अनेक वेळा शाळा बंद झाल्याचे हा अहवाल दर्शवतो. यामध्ये दक्षिण आशिया हा सर्वात जास्त प्रभावित प्रदेश होता, ज्यामध्ये १२८ दशलक्ष विद्यार्थ्यांचे शालेय शिक्षण हवामान बदलांमुळे विस्कळीत झाले. त्यानंतर पूर्व आशिया आणि पॅसिफिक प्रदेशात ५० दशलक्ष विद्यार्थी प्रभावित झाले. सप्टेंबर २०२४ मध्ये हवामानाशी संबंधित समस्यांमुळे सर्वाधिक शाळा व्यत्यय नोंदवले गेले. या महिन्यात किमान १८ देशांमध्ये शाळांचे वर्ग अधिक काळासाठी स्थगित केले. यागी चक्रीवादळामुळे पूर्व आशिया आणि पॅसिफिक प्रदेशामध्ये १.६ कोटी मुलांना फटका बसल्याचे 'युनिसेफ'च्या अहवालातून दिसून आले आहे. याचबरोबर आफ्रिकेत, जिथे १०.७ कोटींहून अधिक मुले आधीच शाळेबाहेर आहेत, तेथे गेल्या वर्षी हवामानाशी संबंधित व्यत्ययांमुळे आणखी २० कोटी मुलांना शाळा सोडण्याचा धोका निर्माण झाला आहे, असे हा अहवाल सांगतो.

या अहवालाचा सारांश काढल्यास २०२४ मध्ये, जगभरातील सातपैकी एक शाळेत जाणारे मूल हवामान बदलामुळे बराच काळ शाळेत जाऊ शकले नाही. युनिसेफने आपल्या अहवालात इशारा दिला आहे की जर हरितगृह वायूंचे उत्सर्जन असेच सुरू राहिले तर २०५० पर्यंत मुलांना उष्ण वाऱ्यांचा सामना करावा लागण्याची शक्यता आठ पटीने वाढेल. जागतिक तापमानवाढीच्या धोक्यांनी जगाला चिंताग्रस्त केले आहे. विक्रमी उष्णतेमुळे सामान्य जीवन विस्कळीत झाले आहे. शुद्ध पिण्याच्या पाण्याचे स्रोत आटू लागले आहेत. त्यातून शेतीवरही एक नवीन संकट ओढवत आहे. गेल्या वर्षी, भारतीय हवामान विभागाने माहिती दिली होती की, २०२४ मध्ये भारतातील सर्व जुने उष्णतेचे रेकॉर्ड मोडीत निघाले असून हे वर्ष १९०१ नंतरचे सर्वात उष्ण वर्ष म्हणून नोंदवले गेले. युनिसेफने स्पष्ट केले आहे की हवामान संकटामुळे केवळ मुलांचे शिक्षणच नाही तर त्यांचे संपूर्ण भविष्य धोक्यात येत आहे. जर या संकटाचा सामना करण्यासाठी तातडीने, प्रभावी आणि आवश्यक पावले उचलली गेली नाहीत तर त्याचे दुष्परिणाम दीर्घकाळ जाणवतील आणि नवीन पिढीचे जीवन अनेक धोक्यांनी वेढले जाईल. हवामान बदलाचा केवळ मुलांच्या शिक्षणावर परिणाम होत नाही तर त्याचे इतरही अनेक परिणाम होतात. हवामान बदलाचा मुलांच्या शारीरिक आरोग्यावर, मानसिक आरोग्यावरही प्रतिकूल परिणाम होतो. अति उष्णतेच्या आपत्तीमुळे नैराश्य, चिंता, झोपेचे विकार वाढीस लागतात. यामुळे शिकण्यात अडचणी येतात. मुलांच्या अभ्यासावर परिणाम होतो आणि परीक्षेचे निकाल अपेक्षेनुसार येत नाहीत. प्रौढांपेक्षा मुले शारीरिकदृष्ट्या हवामान आणि पर्यावरणीय धक्क्यांबाबत अधिक संवेदनशील आणि असुरक्षित असतात. पूर, दुष्काळ, वादळ आणि उष्णता यांसारख्या आपत्तींना तोंड देण्यास आणि टिकून राहण्यास मुले कमी सक्षम असतात. त्यामुळे त्यांचे जगणे, संरक्षण, विकास आणि सहभाग या मूलभूत अधिकारांवर हवामान बदलांचा प्रतिकूल परिणाम होतो. इतर संभाव्य परिणामांमध्ये अनाथत्व, तस्करी, बालकामगार, शिक्षण आणि विकासाच्या संधींचा तोटा, कुटुंबापासून वेगळे होणे, वेगळेपणा, बेघरपणा, भीक मागणे, आघात, भावनिक अडथळे, आजार इत्यादी गोष्टी आहेत.

हे संकट जगभर असले तरी, दक्षिण आशियातील इतर देशांच्या तुलनेत जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या भारतात त्याचा परिणाम जास्त दिसून आला आहे. जागतिक तापमानवाढीच्या भयानक संकटावर नियंत्रण मिळवणे हे सर्वात मोठे आव्हान आहे.

# पुलवामा : भ्याड आत्मघाती हल्ला !



**आज** जगभरात १४ फेब्रुवारी हा दिवस 'व्हेलेंटाईन डे' म्हणून साजरा केला जातोय. मात्र सहा वर्षांपासून हाच दिवस देशासाठी आणि भारताच्या जवानांसाठी काळा दिवस ठरला. याच दिवशी जम्मू-काश्मीरमधील पुलवामा येथे दहशतवाद्यांनी दहशतवादी हल्ला करून हा दिवस रक्तरंजित केलाय. भारतातील जम्मू आणि काश्मीरच्या पुलवामा जिल्हयातील जम्मू-श्रीनगर राष्ट्रीय महामार्गावरील, लेथापोरा या अवंतीपोर जवळ असलेल्या ठिकाणी केंद्रीय रिझर्व्ह पोलीस फोर्सच्या सैनिकांना घेऊन जाणाऱ्या सुरक्षा दलांच्या वाहनांच्या एका ताफ्यावर १४ फेब्रुवारी २०१९ ला दुपारी सुमारे ३.१५ वाजता एका आत्मघाती हल्लेखोराने आपल्या वाहनासकट हल्ला केला. त्या दिवशीही रस्त्यावर सामान्य वाहतूक होती. जम्मूतील चेनानी रामा संक्रमण शिबिरातून जवानांचा ताफा श्रीनगरकडे रवाना झाला होता. पहाटे निघालेल्या सैनिकांना सूर्यास्त होण्यापूर्वी श्रीनगरच्या बक्षी स्टेडियममधील संक्रमण शिबिरात पाहेचायचे होते. ताफा आपल्या मुक्कामावर सूर्यास्तापूर्वी पोचणे अपेक्षित होते. हा प्रवास सुमारे ३२० कि.मी. अंतराचा होता आणि पहाटेपासून सैनिक प्रवास करीत होते. हल्ला झालेल्या ठिकाणापासून श्रीनगरचे अंतर जेमतेम ३३ कि.मी. एवढे होते. हा हल्ला जैशचा बदला मानला जात होता. कारण हल्ल्याच्या दोन दिवस आधीच पुलवामाच्या रत्नीपोरा भागात सुरक्षा दलांनी एका चकमकीत जैशचा एक दहशतवादी मारला होता. पण भारतानेही या हल्ल्याचे जोरदार प्रत्युत्तर दिले होते. या हल्ल्याच्या काहीच दिवसांनी भारतीय लष्करानं पाकिस्तानमध्ये घुसुन बालाकोटमध्ये सर्जिकल स्ट्राईक करुन दहशतवाद्यांचा खात्मा केला होता. त्या दिवशी जैशच्या ठिकाणी हल्ला करुन भारताने ३०० पेक्षा जास्त दहशतवादी ठार केले होते.

आदिल अहमद डार उर्फ आदिल अहमद गादी टेकरनवाला उर्फ वकास कमांडो असे त्या आत्मघाती हल्लेखोराचे नाव होते. या अपघातानंतर त्या हल्लेखोराचा एक व्हिडियोपण प्रसारित करण्यात आला होता. या हल्ल्यात एका महिंद्र स्कॉर्पियो वाहनाचा वापर करण्यात आला होता. या वाहनात सुमारे ३०० किलो स्फोटके भरलेली होती. ताफ्यातील केंद्रीय राखीव बलातील सुमारे ४० सैनिकांचा घटनास्थळीच मृत्यू झाला तर हल्लेखोर देखील मरण पावला. या काफिल्यात सुमारे ७८ वाहने व सुमारे २५०० पेक्षा जास्त सैनिक होते. मात्र पुलवामामध्येच जैशच्या दहशतवाद्यांनी या जवानांना लक्ष्य केले. सैनिकांच्या या ताफ्यातील अनेक सैनिक आपली रजा संपवून कर्तव्यावर परतले होते. जैशला या ताफ्यातील सर्व २५०० सैनिकांना लक्ष्य करायचे होते. हल्ल्यानंतर सीआरपीएफ अधिकाऱ्याने या हल्ल्याची माहिती दिली होती. ताफ्यात सुमारे ७८ बसेस होत्या पण फक्त एका बसवर हल्या झाल्याचे त्यांनी त्यावेळी सांगितले होते. हा ताफा जम्मूहून श्रीनगरला जात होता. धक्कादायक बाब म्हणजे पाकिस्तान स्थित इस्लामिक गट जैश-ए-महंमद या दहशतवादी संघटनेने काश्मीरची वृत्तसंस्था जीएनएसला टेक्स्ट मॅसेज पाठवून या हल्ल्याची जबाबदारी घेतली होती.

पुलवामा येथे शहीद झालेल्या ४० जवानांच्या बसमध्ये महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर येथील कॉन्स्टेबल ठका बेलकर यांचाही समावेश होता. हल्ल्याच्या आधीच काही दिवस त्यांचे लग्न ठरले होते. कुटंबातील मंडळी त्यांच्या लग्नाची तयारी करत होते. बेलकर यांनी रजेसाठी अर्ज केला होता. परंतु त्यांची रजा मंजूर झाली नव्हती. त्यामुळे आपल्या सहकाऱ्यांसोबत तेही या बसमधून निघाले होते. परंतु बस सुटण्याआधी काही वेळ त्यांना मोबाईलवर रजा मंजूर झाल्याचा मेसेज आला आणि ते बसमधून खाली उतरले. त्यानंतर काही वेळातच या बसवर हल्ला झाला. पण काही वेळापूर्वी आलेल्या मेसेजमुळे बेलकर यांचे प्राण वाचले.

पुलवामा हल्ल्याच्या जखमा अजूनही ताज्या आहेत. पुलवामा जिल्ह्यात स्फोटकांनी भरलेल्या गाडीनं सीआरपीएफच्या जवानांच्या बसला धडक दिली. त्यात ४० जवान शहीद झाले. तर अनेकजण गंभीर जखमी झाले. दहशवाद्यांनी केलेल्या या भ्याड हल्ल्यात सीआरपीएफचे ४० जवान शहिद झाले होते. शहिद झालेल्या ४० शहिदांमध्ये सीआरपीएफच्या ७६ व्या बटालियनच्या ५ जवानांचा समावेश होता. स्फोट एवढा जोरदार होती की, काही काळ सर्वत्र धुळीशिवाय काहीच दिसत नव्हते. धुर दूर होताच तेथील भयावह दृश्य पाहून संपूर्ण देश त्या दिवशी रडला हाता. या हल्ल्यात जवानांच्या मृतदेहाचे तुकडे इकडे-तिकडे विखुरले गेले होते आणि घटनास्थळी रक्ताचा सडा पडला होता. या भ्याड हल्ल्यानंतर या घटनेच्या जोरदार प्रतिक्रिया उमटल्या आणि संपूर्ण देशातून संतापजनक व्यक्त करण्यात आला होता. या हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानला दिलेला 'मोस्ट फेव्हर्ड नेशन' हा दर्जा काढून घेतला. पुलवामा हल्ल्याला आज सहा वर्षे पूर्ण झाली आहेत आणि देशभरात या शहिदांना श्रद्धांजली वाहिली जात आहे. आजच्या दिनी त्या सर्व शहिद जवानांना भावपूर्ण श्रध्दांजली !

# मिर्झा गालिब: सहानुभूती व मानवतेचे उपासक!

**मिर्झा असदुल्ला खान 'गालिब' हे एक प्रसिद्ध फारसी आणि उर्दू कवी होते. ते सुधारक वृत्तीचे, सर्व धर्मांना समान मानणारे, कर्मठ नसलेले, नमाज पढणारे, रोजा ठेवणारे, कलेचे आसक्त, रसिक व्यक्ती होते. मिर्झा गालिबजी हे थोरल्या बाजीरावांची पत्नी मस्तानी हिच्या वंशात जन्माला आले होते. त्यांनी फारसी भाषेत लिखाण काम सुरू केले. त्यांच्या साहित्यात जीवनाचे गंभीर तत्त्वज्ञान त्यांनी मांडले. त्यांची ज्ञानवर्धक माहिती 'बापू'- श्रीकृष्णदास निरंकारीजींच्या शब्दांत... संपादक.**

**(मिर्झा गालिब स्मृतिदिन/ पुण्यस्मृती/ पुण्यस्मरण विशेष)**

जीवनाच्या झळा सोसून मिर्झा गालिबजींनी त्या सुंदर करून काव्यातून मांडल्या. त्यांनी एकूण १८ हजारच्या वर शेर फारसी भाषेत रचले. पुढे मित्रांच्या आग्रहाखातर त्यातीलच हजार-बाराशे शेर त्यांनी उर्दू भाषेत लिहिले. त्यांनी कधी कोणताही उद्योग-धंदा केला नाही. मित्रांच्या आणि नातेवाईकांच्या सहकार्याने ते राहत. त्यांना स्वतःला प्रसिद्धी मिळविण्याची गरज वाटली नाही. उत्तर मोगल काळातील राजांच्या, उमरावांच्या दरबारी जाणेही त्यांना आवडत नसे. ते म्हणाले होते, 'माझ्या कविता माझ्या मृत्यूनंतरही अजरामर राहतील.' ते तंतोतंत सत्यात उतरले आहे. त्यांच्याच शब्दांत-

**'हैं और भी दुनियामें**
**सुखन-वर बहुत अच्छे;**
**कहते हैं कि गालिब का**
**अंदाज-ए-बयाँ और।'**

मिर्झा गालिब हे एक प्रख्यात उर्दू कवी होते. त्यांचे पूर्णनाव मिर्झा अब्दुल्ला खान व टोपणनाव 'गालिब' असे होते. गालिबजींचा जन्म आग्रा येथे दि.२७ डिसेंबर १७९७ रोजी झाला. त्यांचे वडील मिर्झा अब्दुल्ला बेग खान हे लष्करात अधिकारी होते. ते गालिब पाच वर्षांचे असतानाच एका लढाईत मारले गेले. त्यानंतर त्यांचा सांभाळ आग्र्यास त्याच्या आजोबांनी केला. तेथे ते ऐषो-आरामात वाढले. तत्कालीन पद्धतीनुसार त्यांचे अरबी व फारसीचे शिक्षण झाले. ते मुळातच बुद्धिमान आणि प्रतिभासंपन्न होते. वयाच्या तेराव्या वर्षी त्यांचा उमराव बेगमशी विवाह झाला आणि सतराव्या वर्षी ते दिल्लीत स्थायिक झाले. सन १८२८च्या सुमारास ते वर्षासनाच्या खटल्यानिमित्त कलकत्त्यास गेले. तेथे ते सुमारे दोन वर्षे होते, तथापि या खटल्याचा निकाल त्यांच्या विरुद्ध गेल्याने ते दिल्लीस परतले. या खटल्यात त्यांचे सर्व प्रयत्न अपयशी ठरल्यामुळे त्यांना फार मनस्ताप झाला. कर्जही बरेच झाले, मात्र त्यांनी वर्षासनास आपले प्रयत्न मोठ्या चिकाटीने चालूच ठेवले. त्यांचे बहुतांश आयुष्य दिल्लीतच व्यतीत झाले. मिळणारे तुटपुंजे वर्षासन तसेच अयोध्येच्या नबाबाकडून आणि दिल्ली दरबारातून मिळणाऱ्या थोड्याफार वेतनावरच राहावे लागले. अतिशय तंगीत ते आपला निर्वाह करू लागले. उत्पन्नाच्या मानाने त्यांचा खर्च बराच होता. त्यातल्या त्यात त्यांना दारूचेही व्यसन होते. त्यामुळे ते अतिशय कर्जबाजारी बनले. त्यांना जुगाराचाही नाद असल्याने तुरुंगातही जावे लागले होते. या घटनेचा त्यांच्या मनावर खोलवर परिणाम झाल्याचे त्यांच्या काव्यातून आणि पत्रव्यवहारातून दिसून येते. त्यांना सात मुले झाली, पण ती अल्पवयात वारली. त्यांचे कौटुंबिक जीवनही फारसे सुखी नसावे, असे दिसते. सन १८५७च्या उठावाच्या वेळी ते दिल्लीतच होते. दस्तंबू या रोजनिशीवजा फारसी गद्यग्रंथात त्यांनी या उठावाची हकिगत लिहून ठेवली आहे. दि.११ मे १८५७ ते ३१ जुलै १८५८ पर्यंतच्या घटना या रोजनिशीत आल्या आहेत. त्यात त्यांनी केवळ आपद्धर्म म्हणून इंग्रजांची स्तुती आणि उठाव करणाऱ्यांची निंदा केली आहे. तथापि त्यांनी आपल्या मित्रांना लिहिलेल्या पत्रांतील त्यांची मते याहून सर्वस्वी वेगळी व विरोधीही आहेत. एक शेर-

**'दिल-ए-नादाँ**
**तुझे हुँआ क्या?**
**आखिर इस दर्द**
**की दवा क्या है?**
**नुक्तार्ची है ग़म-ए-दिल उस**
**को सुनाये न बने!'**

त्यांच्या समग्र फारसी कवितांचा कुल्लियात-इ-गालिब हा संग्रह प्रसिद्ध असून त्यात कसीदा, गझल, मस्नवी आदी प्रकारांतील रचनांचा समावेश आहे. त्यांच्या उर्दू रचनेचा दीवान-इ-गालिब हा संग्रह इतका गाजला, की त्यांच्या हयातीतच त्याच्या चार आवृत्त्या निघाल्या. फारसी धर्तीच्या



रचनेमुळे यातील त्यांची काही रचना दुर्बोध झाली आहे, तथापि जी सोपी आहे ती अतिशय कलात्मक व प्रसन्न आहे. आपला आशय ते सखोल अनुभूतीतून व अभिनव पद्धतीने व्यक्त करतात. या दोन काव्य संग्रहांव्यतिरिक्त त्यांचे काही फारसी व उर्दू गद्यग्रंथही आहेत. फारसी गद्यग्रंथांत मिहर-इ-नीमरोज हा तैमूर वंशाचा हुमायूनपर्यंतचा इतिहास, पहिला खंड, कुल्लियात-इ-नस्र हा गद्यलेखांचा संग्रह, दस्तंबू हा १८५७च्या उठावाची हकीगत, पंज-गंज-इ-आहंग हा फारसी व्याकरण व शैलीवरील प्रबंध, कातिअ-इ-बुर्हान हा बुर्हान-इ-कातिअ या फारसी शब्दकोशावरील टीका यांचा समावेश होतो. त्यांच्या उर्दू गद्यग्रंथांत ऊद-इ-हिंदी आणि उर्दू-इ-मुंअल्ला या दोन पत्रसंग्रहांचा अंतर्भाव आहे. त्यांच्या या सर्वच फारसी-उर्दू ग्रंथांच्या अनेकांनी पुढे विविध आवृत्त्या प्रकाशित केल्या.

**'काबां किस नूर से**
**जाओगे गालिब?**
**शर्म तुमको**
**मगर नहीं आती!'**

गालिबजींनी आपल्या मित्रांना व अनुयायांना वेळोवेळी लिहिलेली उर्दू पत्रे वाङ्मयीनदृष्ट्या श्रेष्ठ असून त्यांची भाषाशैली वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्यामुळेच ते आधुनिक उर्दू गद्याचे प्रवर्तक मानले जातात. त्यांच्या या पत्रांतून तत्कालीन मुस्लिम समाजाच्या विविधांगावर तसेच त्यांच्या व्यक्तिमत्त्वावरही चांगला प्रकाश पडतो. त्यांच्या या पत्रांची गणना उर्दूतील अभिजात साहित्यात केली जाते. फारसी व उर्दू यांच्या संश्लेषणातून गालिबजींनी आपली उर्दू कविता लिहिली. सखोल अनुभूती व तात्त्विक चिंतन यांचा कलात्मक आविष्कार त्यांच्या काव्यात आढळतो. धार्मिक व सांप्रदायिक भेदभावांना त्यांच्या विचारात स्थान नाही. त्यांच्या मते केवळ एकाच परमेश्वराची शुद्ध उपासना करणाऱ्याच्या ठिकाणी धार्मिक भेदभावाच्या भावनेचा लोप होतो. प्रत्येक धर्मी व उपासकास तो एकच परमेश्वर नेतो. अपार सहानुभूती व मानवतेचे असीम प्रेम यांचे ते उपासक होते. त्यांचा मित्रपरिवार व अनुयायीवर्ग फार मोठा होता व त्यांत विविध धर्मांचे लोक होते. त्यांचे काव्य कळावयास कठीण असले, तरी त्यात एकदम हृदयाला जाऊन भिडण्याचे सामर्थ्य आहे. तुर्की परंपरेस अनुसरून त्यांच्या ठिकाणी पावित्र्याची चाड, पराकाष्ठेचा अभिमान, गुढवाद, ऐहिक जीवनातील सुखदुःखे, परंपरागत सामाजिक रूढी, उदारमतवाद तसेच नैराश्य व आशावाद यांचे चमत्कारिक मिश्रण झालेले दिसून येते. गालिबजींची फारसी गद्य-पद्य रचना उत्कृष्ट असूनही आजवर ती उपेक्षितच राहिली आहे. समीक्षाकांचे तिच्याकडे म्हणावे तसे लक्ष वेधले नाही आणि त्यामुळेच तिचे यथायोग्य मूल्यमापनही होऊ शकले नाही. बघा-

**'ये नथी हमारी किस्मत कि**
**विसाल-ए-यार होता;**
**हजारो ख्वाईशें ऐसी के हर**
**ख्वाईश पे दम निकलें।'**

वयाच्या अकराव्या-बाराव्या वर्षापासूनच ते कविता रचू लागले आणि पंचविसाव्या वर्षापासून त्यांनी उर्दूत काव्यरचना केली. त्यांच्या सुरुवातीच्या रचनेवर फारसी कवी बेदिल यांचा प्रभाव होता. बेदिलचे ऋण त्यांनी आपल्या काव्यात मोकळ्या मनाने मांडले आहे. नंतरच्या त्यांच्या रचनेवर मात्र कोणाही कवींचा प्रभाव नसून ती संपूर्णपणे स्वतंत्र आहे. वयाच्या त्रेपन्नाव्या वर्षापर्यंत मात्र त्यांनी उर्दूऐवजी फारसीत रचना केली. त्यांचे फारसीवर विशेष प्रेम होते. आपली उत्कृष्ट रचना उर्दूऐवजी फारसीतच आहे, असे ते म्हणत. परंतु त्यांची विशेष ख्याती मात्र उर्दू काव्यामुळेच झाली. सन १८५०पासून पुढे बहादूरशाह जफर या मोगल बादशहाच्या सांगण्यावरून ते परत उर्दूत रचना करू लागले. या काळातील त्यांची उर्दू रचना दर्जेदार व परिपक्व आहे. त्यांना दिल्ली दरबारातून 'नज्मुद्दौला दबीरुल्मुल्क निजामगंज' हा मानाचा किताब मिळाला होता. हाली, रख्शाँ, जकी, मजरुह, मुन्शी हरगोपाल तुफ्ता, मुन्शी बिहारीलाल मुश्ताक आदी त्यांचे प्रमुख अनुयायी होते. हाली हा त्यांचा आद्य चरित्रकार व अनुयायी होता. त्याने सन १८९७ साली उर्दूत यादगार-इ-गालिब हे गालिबजींचे आठवणीवजा चरित्र लिहिले, ते विशेष प्रसिद्ध आहे. मिर्झा गालिबजी यांचे दिल्ली येथे दि.१५ फेब्रुवारी १८६९ रोजी निधन झाले. तेथे त्यांची कबर आहे.

!! स्मृतिदिनी त्यांना व त्यांच्या शेरोशायरींच्या पावन स्मृतींना विनम्र अभिवादन !!



- संकलन व शब्दांकन -
**श्री एन. के. कुमार**
जी. से.नि.अध्यापक.
गडचिरोली मोबा-
७७७५०४१०८६.

# ध्वजारोहण करून शिवचरित्र पारायनाने 'शिवजन्मोत्सव' सोहळ्याला सुरुवात

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

जिल्हा शिवजयंती महोत्सव समितीच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती निमित्ताने ङ्गशिवजन्मोत्सवङ्घ सोहळ्याला उत्साहात गुरुवारी (दि.१३) सुरुवात झाली. वेरूळ येथील मालोजी राजे यांच्या गढीवर सकाळी १०.३० वाजता स्वराज्य संकल्पक शहाजीराजे स्मारकास अभिवादन करून मालोजीराजे गढीवर ध्वजारोहण करण्यात आले.

संस्थापक अध्यक्ष पृथ्वीराज भाऊ पवार यांच्या मार्गदर्शनात आयोजित करण्यात आलेल्या या ध्वजारोहण सोहळ्याप्रसंगी जिल्हा शिवजयंती महोत्सव समितीचे अध्यक्ष डॉ.बाळासाहेब थोरात, माजी अध्यक्ष अनिल बोरसे, कार्याध्यक्ष अभिजित देशमुख, राजेंद्र दाते पाटील, महेश उबाळे, प्रसिद्धी प्रमुख सचिन लिला सुखदेव अंभोरे, प्रकाश मिसाळ, श्रीमती अनिता बोरसे, सरपंच रियाज शेख, सतीश कौशिकी, योगेश टोपे, सचिन जाधव, आकाश ठाकरे, सतीश काळे, राजकुमार पांडे, नागेश घुले, अक्षय जाधव, घृष्णेश्वर देवस्थानाचे योगेश कोपरे नागेश घुले, अक्षय जाधव, आदींची यावेळी उपस्थिती होती. ध्वजारोहण प्रसंगी उत्सव समितीचे अध्यक्ष डॉ. बाळासाहेब थोरात म्हणाले कि, परंपरेनुसार छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवजन्मोत्सवाला सुरुवात झाली असून मालोजी राजे गढीवर ध्वजारोहण करत छत्रपती शहाजी महाराजांना अभिवादन उत्सव समितीच्या वतीने करण्यात आले.

छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार प्रत्येक घराघरात पोहचले पाहिजे या हेतूने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात शिवभक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन यावेळी अध्यक्ष थोरात यांनी केले. तर कार्याध्यक्ष अभिजित देशमुख म्हणाले कि, छत्रपती शहाजी महाराजांच्या स्मारकाचे तसेच परिसराच्या सुशोभीकरणाचे काम प्रगतीपथावर आहे.

स्मारकाच्या विकासासाठी सातत्याने पाठपुरावा केल्याने ५०० कोटीचा निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल या राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजितदादा पवार यांचे मी आभार मानतो, तर माजी अध्यक्ष अनिल बोरसे म्हणाले कि, पुरातत्व खात्याला सातत्याने आम्ही पाठपुरावा केला. त्यामुळे निधी मिळाला. छत्रपती शिवाजी महाराजांचे वंशज या वेरूळ परिसरात राहत होते याचा सर्वांनाच अभिमान आहे. छत्रपती शहाजी महाराजांच्या स्मारकाच्या विकासासाठी सर्वच पक्षातील पदाधिकारी एक बैठक घेऊन आगामी काळात पाठपुरावा करतील आणि या ऐतिहासिक स्मारकाचा लौकिक जगभरात पोहचवतील असा मला विश्वास आहे.



**शुक्रवारी विविध शाळांमध्ये किल्ले बनवा स्पर्धा...**

छत्रपती शिवरायांच्या गडकिल्यांचे संवर्धन व्हावे व हे गड किल्ले प्रत्येक येणाऱ्या पिढीला माहित असावेत या उद्देशाने जिल्हा शिवजयंती महोत्सव समितीच्या वतीने शुक्रवारी (दि.१४) शहरातील विविध शाळांच्या परिसरात सकाळी १० ते १२ वाजेदरम्यान किल्ले बनवा स्पर्धा उत्सव समितीच्या वतीने आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांना उत्सव समितीच्या वतीने पारितोषिके देऊन गौरविण्यात येणार असून या अभिनव उपक्रमात शालेय विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन जिल्हा शिवजयंती महोत्सव समितीचे अध्यक्ष डॉ.बाळासाहेब थोरात यांनी केले आहे.

**छत्रपती शिवचरित्र पारायण वाचनाला सुरुवात...**

सकाळी ८.३० ते ११.३० वाजे दरम्यान १३ ते १९ फेब्रुवारी कालावधीत क्रांती चौक येथे छत्रपती शिवचरित्र पारायण सप्ताह प्रा. चंद्रकांत भराट यांच्या संयोजनात सुरवात करण्यात आला. या शिवचरित्र पारायण सोहळ्याचे उद्घाटन सर्व धर्मीय ग्रंथ दिंडीने करण्यात आले. यावेळी हिंदू, मुस्लीम, सिख, इसाई... हम सब शिवछत्रपती के शूर सिपाही अशा घोषणा देत मराठी, इंग्रजी, उर्दू व सर्व माध्यमांचे शालेय विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवचरित्र पारायण वाचनाला सुरुवात केली. या पारायनात दोन हजारहून अधिक विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहात आपला सहभाग नोंदविला.



# श्री ऑल इंडिया श्वेतांबर स्थांकवासी जैन कॉन्फरन्स नवी दिल्ली येथे श्री मिठालाल कांकरिया यांची राष्ट्रीय सचिवपदी नियुक्ती करण्यात आली

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

श्री ऑल इंडिया श्वेतांबर स्थानकवासी जैन कॉन्फ्रेंस नई दिल्ली यांचे निवडणूक सुरू असून महाराष्ट्र मध्ये छत्रपती संभाजीनगर तर्फे मिठालाल कांकरिया यांची राष्ट्रीय कार्यकारणी मध्ये राष्ट्रीय सचिव पदी नियुक्ती करण्यत आली आहे ही संस्था श्रमण संघ ची १२० वर्षे जुनी मातृसंस्था आहे या संस्थेमध्ये साधू संतांची सेवा, साधु संतांची विहार, आगामी चातुर्मास करिता संस्था आहे, या संस्थेमध्ये छत्रपती संभाजीनगर तर्फे श्री मिठालाल कांकरिया श्री ऑल इंडिया श्वेताबर स्थानकवासी जैन कॉन्फ्रेंस नईदिल्ली में छ.संभाजीनगर संघचे श्रीमान मिठालाल कांकरिया याचा राष्ट्रिय सचिव पद नियुक्ती करण्यात आली आहे यांना श्रमण संघीय आचार्य भगवंत प.पु. श्री शिव मुनिजी म.सा. , युवाचार्य भगवंत प .पु.श्री. महेंद्र ऋषिजी म.सा. , प.पु.श्री प्रबुद्ध मुनिजी म.सा. यांच्या आशीर्वादाने व राष्ट्रीय अध्यक्ष श्री अतुलजी जैन यांच्या मार्गदर्शनाखाली , माजी राष्ट्रीय अध्यक्ष श्री अविनाशजी चोरड़िया, माजी अध्यक्ष श्री पारस जी मोदी, राष्ट्रीय माजी महामंत्री पिंटू भाऊ कर्णावट, राष्ट्रीय माजी उपाध्यक्ष तनसुख झाबड़ , कॉन्फ्रेंस के राष्ट्रीय चेयरमैन श्री कांतीकुमार जैन, महाराष्ट्र के माजी अध्यक्ष श्री मदनलालजी लोढ़ा, यांचे मार्गदर्शन ने व विनोद बोकड़िया,रोहित छाजेड़ , हितेश कांकरिया, रवि लोढ़ा, योगेश रुणवाल, स्वपनिल पारख, संतोष बोरा, अजिंक्य शिंगवी पियुष कासलीवाल नरेंद्र अजमेरा एवं श्री ऑल इंडिया श्वेतांबर स्थानकवासी जैन कॉन्फ्रेंस छ. संभाजीनगर जिल्हा तरफे इतर पदाधिकारी, परिवार, मित्र परिवार , नातेवाईकानी शुभेच्छा दिल्या.

# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ छत्रपती संभाजीनगर जिल्हाध्यक्षपदी छबुराव ताके



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई, विभागीय कार्यालय छत्रपती संभाजी नगरच्या जिल्हाध्यक्ष पदावर दैनिक मराठवाडा केसरीचे मुख्य संपादक छबुराव ताके यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष संजय भोकरे यांच्या सूचनेनुसार सर्वानुमते मंगळवारी (दि.११) संघाच्या झालेल्या मराठवाडा स्तरीय बैठकीत ही निवड करण्यात आली आहे.

प्रदेश अध्यक्ष गोविंद वाकडे, प्रदेश उपाध्यक्ष अशोक देडे, मराठवाडा अध्यक्ष अनिल सावंत राज्य कार्यकारणी तथा मराठवाडा विभागाचे अध्यक्ष यांच्या सहमतीने जिल्हाध्यक्षपदाची निवड करण्यात आलेली आहे.

यावेळी महेंद्र कुमार डेंगळे, डॉ. प्रभू गोरे, लातूर शहर जिल्हाध्यक्ष महादेव डोंबे, सचिन अंभोरे, मुकेश मुंदडा, विलास सिंघी, विकास सोनवणे, सतिष पाटील, अफसर कारभारी सह आदीची उपस्थिती होती.

# वैश्विक शांतीचा-अहिंसेचा संदेश देणारे - संत सेवालाल महाराज

**(संत सेवालाल महाराज यांचा जन्म रामनवमी या दिवशी झालेला आहे. त्यानिमित्ताने पोहरादेवी येथे दरवर्षी रामनवमीला व्यापक प्रमाणात हर्षोउल्हासात जन्मोत्सव साजरा केला जातो. या जन्मोत्सवास देशभरातील लाखो श्रद्धाळू येतात. संत सेवालाल महाराज यांच्या जयंती दिनी पोहरादेवीच्या पवित्र भूमित पशु हत्या करणे अनुचित आहे. संत सेवालाल महाराज यांच्या जयंतीनिमित्त हा विशेष लेख)**

भारत हा साधु संत, ऋषि मुनींचा देश आहे. या देशात अनेक संत महात्म्य होऊन गेलेले आहेत. त्यापैकीच अठराव्या शतकातील संत सेवालाल महाराज एक होत. त्यांचा जन्म परंपरेने व्यापारी आणि गोपालक, गोरक्षक असलेल्या गोर बंजारा परिवारात रामनवमीच्या दिवशी १७३९ साली आंध्र प्रदेशातील गोलालडोडी, ता. गुत्ती, जिल्हा अनंतपूर येथे झाला. त्यांचे बालपणीचे नाव सेवादास होते. ते सेवाभाया, तोडावाळो, मोतीवाळो अशा विभिन्न नावाने ओळखले जायचे . संत सेवालाल महाराज यांनी केवळ मानवजातीचाच नव्हे, तर सर्व प्राणीमात्रांचे हित साधणारे कार्य त्यांनी केले. ते जगतजननी , विश्व व्यापिणी, चैतन्यमयी आई जगदंबेचे निस्सीम उपासक होते. त्यांनी समाजाला संकुचित, हलक्या विचारांपासून वर उठून श्रेष्ठ जीवन जगण्याची शिकवण देऊन आयुष्यभर गोरगरीबांची आणि गोसेवा मनोभावे केली. त्यांच्याकडे साडे तीन हजार पेक्षा अधिक गोधन होते. त्यांनी भक्ती आणि कर्म याची सांगड घालून समाजाला कर्माचे मोल त्यांनी आपल्या आचारणातून पटवून दिले.दुष्ट प्रवृतीच्या लोकांबद्दल ते एका लडीत म्हणतात -

**कपट वाचा लेन आये, पाप सोबत रिये ।**
**यम घरेरो फांसो ओरे गळेमा पड जाये ।**
**नव मणेरी काया ओरी नर्केमा मल जाये ।**
**लख चौयासी योनी भोगाये सेवाभाया ।**

भावार्थ - ज्याच्या मनात कपट आहे, पाप आहे, दुष्ट भावना आहे, अशांच्या डोक्यावर सदैव पाप कर्माचे ओझे असते . अशा दुष्ट प्रवृतीच्या लोकांच्या गळ्यात यम राजाचा फासीचा फंदा फार लवकर पडत असतो. असा दुष्ट माणूस नरकात जातो. तो जन्म मृत्युच्या फेऱ्यात दु:ख भोगत रहातो. त्यामुळे प्रत्येक माणसांनी नीति नियमाने, सदाचाराने वागले पाहिजे. त्यांनी समाजाला दिलेला उपदेश जीवनमूल्यांची पेरणी करण्यास आजही उपयोगी आहेत. सतमार्गाने जीवन व्यतीत करण्यासाठी, मनुष्य जीवनाचे सार्थक करण्यासाठी सद्गुणांचे महत्व सांगतांना आणि जीवन हे केवळ कसे तरी अघळपघळ जगण्यासाठीच नाही, तर ते फार मौल्यवान आहे, या बाबत उपदेश देतांना पुढील लडीत ते म्हणतात की,

**सत्य, दया, धर्म ,**
**लीनता ये गणेती रेणोर ।**
**श्री भगवानेरे शरण जाणो,**
**भव सागर तर जाणोर ।**

भावार्थ - आपल्यात सत्य, दया, धर्म, लीनता हे दैवी गुण विकसित करुन दु:ख, पीडा, अडचणीने भरलेले जीवन नावाचा जो भवसागर आहे, तो सहज तरुन जाण्यासाठी ईश्वराची शरण ग्रहण करुन जीवन व्यतीत करावे. आणि भव सागर सहज तरुन जावा. या लडीव्दारे त्यांनी अध्यात्माला विशेष महत्व दिलेले आहे. संत सेवालाल महाराजांनी व्यवहार आणि अध्यात्माची सुंदर सांगड घालून जीवन मूल्य वृद्धिंगत करण्याचा आग्रह त्यांनी या लडीत धरलेला आहे. प्रपंच सांभाळत अध्यात्माची गोडी लाऊन घेतली पाहिजे. त्यांनी समाजाला कोणत्याही निरर्थक कर्मकांडात गुंतवले नाही. या समाजात बऱ्याच कुप्रथा होत्या. आणि आजही बऱ्याच आहेत. कालांतरांने त्या निश्चितपणे कमी होतीलही . एक प्रथा अशी होती की , या समाजात जात पंचायत होती. ती अतिशय आदर्श अशी होती. पण यातील एक बाब संत सेवालाल महाराजांना नेहमी खटकायची ती म्हणजे , जात पंचायतीत ज्याच्यावर जो कांही आरोप ठेवण्यात आलेला आसायचा तो जर का सिद्ध झाला तर त्या व्यक्तिस दंडित केले जायचे . गरीब आसो की श्रीमंत . आर्थिक दंड आकारला जायचाच. ऐपत असो वा नसो .पंचायतीने ठोठावलेला दंड द्यावाच लगायचा. आपल्या समाजातील , या नीति आणि या परंपरेवर आसूड ओढतांना पुढील लडीत ते अतिशय कठोर शब्दात म्हणतात की,

**गोर गरीबेन दांडन खाये ।**
**सात पीढि नर्केमा जाये ।**
**ओरे वंशेपर कोई कोनी रीये राम ।**
**पायरीरो भाटा वियेरे, बंगला कोट मंयामा ।**

भावार्थ- गरीबांना दंड लाऊन पोट भरणाऱ्यांनो ! तुमच्या सात पिढ्या नरकात जातील , तुमच्या वंशाचा दिवा लावायला कोणी राहणारा नाही. तुमचा वंश नष्ट होईल. तुम्ही पायरीचा दगड बनून कित्येक वर्ष तुडवले जाल. अशा कठोर शब्दात त्यांनी आपल्या समाजातील रुढीबद्दल बोलायचे. तेंव्हा असे प्रकार तुम्ही बंद करा . हा निर्वाणीचा इशारा ते आपल्या समाजाला देत असत. त्याकाळी हा उपदेश महाराजांनी आपल्या समाजाला जरी दिला असला. आणि ते फक्त एका परंपरेबाबत जरी दिलेला असला तरीही तो वर्तमान काळात आज गोर गरीब समाज मग कोणत्याही जाती धर्माचा असो. गरीबांची पिळवणूक करुन जे लोक जगतात . त्यांना प्रताडित करुन, त्याची पिळवणूक करुन पोट भरणार्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत चाललेली आहे. अशांसाठीसुद्धा ही लडी लागू पडते. संत महापुरुष कोणत्याही जाती धर्मात जन्म घेवोत. त्यांचा प्रत्येक स्वास हा समस्त सृष्टिसाठीच असतो. समस्त जीवांसाठीच असतो, समस्त मानव जातीसाठी असतो. संत सेवालाल महाराज ज्या समाजात जन्माला आले होते त्या समाजात त्याकाळी फारसे शिक्षण नव्हते. जवळपास शिक्षण नसल्या सारखेच होते. अशा काळी संत सेवालाल महाराजांचे अमृतवचन नोंदवणे जमलेले नव्हते. त्यांचे वचन पीढि दर पीढि तोंडी संग्रहीत होत गेले. संत सेवालाल महाराजांच्या अनेक जीवन लीला आजही गोर बंजारा समाजात चर्चिल्या जातात. संत म्हणजे एक प्रकारे जीवन प्रवासाला लागणारा ज्ञानरुपी प्रकाश .जीवनात येणारे अनेक संकटं, दु:ख, पीडाप्रसंगी साहस, बळ, शक्ती देऊन हिंमतीने पुढे चालण्यासाठी मार्गदर्शन करणारे, अज्ञान अंधारातून ज्ञान प्रकाशाकडे घेऊन जाणारे नि:स्वार्थ, निर्मोही, निर्लोभी व्यक्तित्व म्हणजे संत. ज्यांच्या अंगी सहजता, साधेपणा, परोपकार, अहिंसा, दया, क्षमा, शांती, प्रेम, सहिष्णुता हे दैवी गुण ओतप्रोत भरलेले असते. संताच्या या गुणातील एक तरी गुण आपल्या जीवनात उतरला पाहिजे. जसा सूर्य भेदभावरहित सर्वांना समान प्रकाश देतो तद्वतच विश्वभरातील संत मानव जातीला निरंतर ज्ञान प्रकाश देत असतात. संत सेवालाल महाराजांचे अनमोल विचार आणि शिकवण प्रत्येक समाजासाठी आजही उपयोगी आहे. जीवन उद्धारक आहे. कोणत्याही संतांना जाती धर्माच्या तराजुत तोलणे गैर आहे. जगभरातील संतांचा इतिहास उघडून पाहिला तर असे दिसून येईल की, संत महापुरुष जरी एखाद्या जातीत किंवा धर्मात जन्माला आलेले असले तरीही त्यांचे कार्य हे फक्त एका जातीसाठी किंवा धर्मासाठी कधीच मर्यादित नव्हते. ते संपूर्ण मानव जाती बरोबरच प्राणीमात्रांसाठीच राहिलेले आहे. संत सेवालाल महाराज तरी त्याला अपवाद कसे राहतील ! त्यांचे कार्यसुद्धा अखिल मानवासाठी होते. संत सेवालाल महाराजांच्या काळात गोर बंजारा समाजात आरदासच्या माध्यमातून (प्रार्थना) विश्वकल्याणाची भावना अधिक वाढीस लागली. 'सेनं सायी वेस ' (सर्वांना प्रसन्न हो , सर्वांचे मंगल होवो, सर्वांचे कल्याण होवो) . ही परस्पर बंधुभाव वाढवणारी भावना जनसामान्यात सर्व दूरपर्यंत जायला हवी. या आरदासमध्ये (प्रार्थनेमध्ये) एका ठिकाणी असे म्हटले आहे की, ' किडी मुंगीन सायी वेस, वाडी वस्तीन सायी वेस.' हे भगवती, हे जगत जननी , या विश्वातील मुंगीहुन लहानातील लहान जीवाचे तू भले कर, त्यांचे मंगल कर. प्राणीमात्रावर दया कर, तू सदैव सर्वांवर प्रसन्न रहा. वैश्विक शांतीचा, अहिंसेचा संदेश देणारे संत सेवालाल महाराज आजही वंदनीय आहेत. लडीव्दारे लोकांना उपदेश देतांना ते म्हणायचे की, नीति नियमाने वागा, कोणाचेही वाईट चिंतु नका, चोरी करु नका, कोणालाही दंडित करु नका, दुर्सयांची धन संपती बळकावू नका. धनसंपत्तीच्या बळावर गोर गरीबांना छळू नका, त्यांना त्रास देऊ नका, जीवहत्या करु नका, पाप कर्मापासून नेहमी दूर रहा, सर्वांच्या हिताचे रक्षण करा. अहिंसेच्या मार्गाने चला.

संत सेवालाल यांनी उद्गारलेली अनेक वचनं आज प्रत्यक्ष अनुभवाला येत आहेत. जसे - 'रपिया कटोरो पाणी वकीये' म्हणजे एक रूपयाला एक वाटी पाणी विकल्या जाईल. 'बेटा मां बापेन भारी विये' भावार्थ - ' ज्या आई वडिलांनी मुलांना जन्म देऊन त्यांचे लालनपालन करुन मोठे केले . ती मुलं आई वडिलांचे म्हणणे ऐकणार नाहीत, मनमानी करतील.' आज या सर्व गोष्टी प्रत्येक समाज अनुभवतो आहे.

जर आपण हृदयापासून संतांच्या आश्रयाला असू किंवा संतांची भक्ती केली तर त्यांचे सर्व हितकारक गुण आपल्यात उतरले पाहिजेत. संताच्या दैवी वाणीनुसार वागले पाहिजे, त्यांनी सांगितलेल्या कल्याणाच्या मार्गावर चालले पाहिजे आणि मानव जीवनाचे सार्थक केले पाहिजे. कोणतेही संत उपासकास सत्याशी जोडतात. जे उपासक किंवा श्रद्धाळू संतांची सेवा ,भक्ती मनापासून करतात ते संतानी ज्या तत्वाची, शक्तिची उपासना, आराधना केलेली असते त्या तत्वाशी किंवा शक्तिशी जोडल्या जातात . हे मर्म समजून जो कोणी संतांच्या मार्गाने चालतो त्याला याची अनुभूति निश्चितपणे येते म्हणजे येतेच. संत महापुरुषांची जयंती साजरी करणे निश्चितच ऊर्जा देणारा प्रसंग असतो, पण संत महापुरुषांचे एक दिवस केवळ गुणगान करुन, ढोलतासे बडवून जयंती साजरी केल्याने स्वत:चा किंवा समाजाचा उद्धार कधीही होणार नाही. उद्धाराचा मार्ग एकच आहे आणि तो म्हणजे संतांच्या कल्याणकारी विचार मार्गाने वाटचाल करणे.



मानवता, अहिंसेचे पुजारी संत सेवालाल महाराज यांच्या मानव कल्याणकारी विचारांना बळ देण्यासाठी प्रत्येकानी स्वत: पासून सुरुवात करायला पाहिजे. स्वत:ला, स्वत:च्या परिवाराला, समाजाला अधोगतिकडे घेऊन जार्णाया सर्व वाईट चालीरीती, कुप्रथा, अंधश्रद्धा, रुढी परंपरा, देवी देवतांच्या नावाने केली जाणारी पशुहत्या, व्यसन, हुंडा पद्धत या गोष्टीचा त्याग करायला पाहिजे. ही खरी संत सेवा आहे. ही खरी संत भक्ती आहे. केवळ एक दिवस हुल्लडबाजी करणे म्हणजे क्षणिक आनंद आहे. खरा आनंद घेण्यासाठी संत विचार आपल्या जीवनात रुजवून मर्यादेत, संयमपूर्ण जीवन जगावे लागेल. आज अनेक लोक देवाला, संत महापुरुषाला मानतात. घरात मोठमोठे फोटो ठेवतात. पण आचरण मात्र विसंगत करतात. संत सेवालाल महाराज यांची वाणी, त्यांचा उपदेश हा केवळ भाषणाचा विषय नसून ते उन्नत, श्रेष्ठ जीवन जगण्याचे एक अमूल्य साधन आहे. हे जो पर्यंत समाज समजून घेणार नाही तो पर्यंत भक्ती कमी आणि देखावा जास्त हे प्रकार मोठ्या प्रमाणावर दिसत राहणार आहेत. मानवतावादी, अहिंसावादी संत सेवालाल महाराजांच्या विचारांना उजाळा देण्यासाठी त्यांच्या वचनानुसार आचरण केले पाहिजे. संत सेवालाल महाराज यांचे विश्व कल्याणाच्या विचारांचा सार असा आहे की, जसे उपनिषेधात म्हटलेले आहे-


**ॐ सर्वे भवन्तु सुखिन:।**
**सर्वे सन्तु निरामया:।**
**सर्वे भद्राणि पश्यन्तु।**
**मा कश्चितब दु:ख भाग्भवेत?**
**ॐ शान्ति: शान्ति: शान्ति: ?**

हे ईश्वरा ! सर्वांना सुखी ठेव, सर्वांना रोगमुक्त ठेव, सर्वांचे जीवन मंगलमय बनव आणि कोणीही दु:खाचे भागीदार बनु नये. असा आम्हाला वरदान दे. हाच भावार्थ संत सेवालाल महाराजांच्या समग्र शिकवणुकीचा आहे. प्रत्येकांनी हा धागा पकडून जरी जीवन व्यतीत केले तरीही मानव जीवन सार्थक होऊ शकते. जगातील वर्तमान हिंसक चित्र पाहता संत कोणत्याही जाती धर्माचे असोत त्यांचे जीवनोपयोगी, मानवता धर्म समाजात रुजवणारे विचार ग्रहण करुन आपल्या जीवनाचे सार्थक करणे यातच स्वत:चे आणि विश्वावाचे कल्याण आहे. आजच्या काळात संत मार्गाने गेल्याशिवाय जगात शांतता नांदणार नाही.

**- प्रा. फुलसिंग जाधव,** छत्रपती संभाजीनगर

## मन चंगा तो कटोती में गंगा



संत शिरोमणी रविदास महाराज जयंती निमित्त अंबिकानगर आणि रविदास नगर येथे फुलंब्री मतदारसंघाच्या आमदार अनुराधाताई चव्हाण यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. तसेच संत रविदास महाराजांच्या विचारांचा वारसा कायम ठेवत, समाजातील समानता आणि बंधुत्व जतन करण्याचा संकल्प ही आमदार चव्हाण यांनी केला. यावेळी आमदार श्री.नारायणभाऊ कुचे, श्री.दीपक खोतकर, श्री.रामचंद्र नरोटे, श्री.मनोज गांगवे, श्री.गणेश गरडवार, श्री.निखिल चव्हाण, पदाधिकारी आणि स्थानिक नागरिक उपस्थित होते.

# शेतातील पत्र्याचे शेडमध्ये चालणारा जुगार अड्ड्यावर विशेष पथकाची धाड

## १४ इसम ताब्यात तर १४,०६,३६०/- रुपयांचा मुद्देमाल जप्त

### मा. पोलीस अधीक्षक यांचे विशेष पथक छत्रपती, संभाजीनगर ग्रामीण यांची कारवाई

**छत्रपती संभाजीनगर
(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

मा. डॉ. विनयकुमार राठोड, पोलीस अधीक्षक यांनी जिल्हयातील छुप्यामार्गाने चालणाऱ्या जुगार अडयावर गोपनीय माहिती काढुन त्यांचेवर मा. पोलीस अधीक्षक यांच्या विशेष पथकांद्वारे छापेमारी करून गुन्हे दाखल करण्यात येत आहे..

याअनुषंगाने मा. पोलीस अधीक्षक यांचे विशेष पथकास दिनांक १२/०१/२०२५ रोजी माहिती मिळाली कि, पोलीस ठाणे खुलताबाद हद्दीतील शार्दुलवाडी गावात जाणारे रोडलगत असलेल्या शेतातील पत्र्याचे शेड मध्ये काही ईसम हे तिरट नावाचा जुगार हा पत्त्यावर (कॅट) रुपये लावुन खेळत व खेळवित आहे अशी माहिती मिळाली होती.

यावरून पथकाने कारवाईच्या अनुषंगाने शार्दुलवाडी गावाचे दिशने जाताना, त्यांना गावात जाणा-या रस्त्यालगत असलेल्या अमजद बिसमिल्लाखान पठाण याचे शेतामध्ये वाहने लावलेली दिसली तेथे ०८ मोटरसायकल, स्विफ्ट कार, ॲटोरिक्षा असे दिसुन आले. संपुर्ण परिसराची बारकाईने व छुप्या पध्दतीने पाहणी केली असता तेथे असलेल्या पत्राचे शेड मध्ये काही व्यक्तींची संशयीत हालचाल नजरेस पडली.

यावरुन सापळा लावुन छापा मारण्याचे नियोजन केल्यानुसार पोलीसांचे पथकांनी रात्री अंदाजे १८:२० वाजेच्या सुमारास लपत छपत जावुन अचानक पत्र्याचे शेडला घेराव टाकुन छापा टाकला असता, तेथे १४ ईसम हे पत्यावर तिर्रट जुगार खेळतांना दिसुन आले.



पोलीसांनी अचानक झडप घालुन कारवाई केल्याने जुगारी ईसमांची धांदल उडाली व यातील काही ईसम हे मिळेल त्या रस्त्याने सैरावैर पळत सुटले परंतु तरीही पथकातील पोलीसांनी त्यांचा पाठलाग करून त्यांतील सर्व १४ जुगा-यांना ताब्यात घेतले आहे.

यामध्ये १) अमजद बिस्मील्लाखान पठाण वय ४२ वर्षे रा. वेरूळ २) प्रल्हाद काशिनाथ ढिवरे वय ५२ वर्ष रा. वेरूळ ३) सजन फकिरचंद जंगाळे वय ३८ वर्षे रा.सयजतपुर ता. खुलताबाद ४) कचरू मन्साराम सुलाने वय ३८ वर्षे रा. तळयाची वाडी वेरूळ, ५) दिपक भाऊराव चव्हाण वय ३९ वर्षे रा.खिर्डी ६) अलीम पापा शेख वय ४२ वर्षे रा.कसाबखेडा ७) अर्जुन भिमराव साळवे वय ४१ वर्षे रा. वेरूळ ८) शेख कादर शेख रज्जाक वय ५५ वर्षे रा. टाकळी राजेराय ९) भगवान लक्ष्मण बोडखे वय ४५ वर्षे रा. वेरूळ १०) अंकुश अण्णा गायकवाड वय ३२ वर्षे रा.वेरुळ ११) रियाज शेख जकात वय ३४ वर्षे रा. वेरूळ १२) मदन मगन घुनवात वय ४५ वर्षे रा. तळयाची वाडी वेरूळ, १३) अयाज लतीफ खान वय ३९ वर्षे रा. वेरूळ १४) तन्वीर शेख मोहंमद वय ३० वर्षे रा. वेरूळ यांना ताब्यात घेवुन नमुद आरोपीविरुध्द पोलीस ठाणे खुलताबाद येथे महाराष्ट्र जुगार कायदा कलम १२ (अ) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास पोलीस ठाणे खुलताबाद हे करित आहेत.

नुमद कारवाई मध्ये रोख २४,३६० /- रुपयांसह, ०८ दुचाकी वाहने, १४ मोबाईल फोन, एक स्विफ कार व एक ॲटोरिक्षा यासह १२ पत्ताचे कॅट, इतर जुगाराचे साहित्य असे एकुण १४,०६,३६०/- रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

नमुद कारवाई ही मा.डॉ. विनयकुमार राठोड, पोलीस अधीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली विशेष पथकातील स.पो.नि. सुधीर मोटे, पोलीस अंमलदर जावेद शेख, संदीप आव्हाळे, कल्याण खेडकर, विनोद जोनवाल, यांनी केली आहे.

## विद्यार्थ्यांच्या कलाविष्काराने रसिक मंत्रमुग्ध, ए.एफ.के. जी इंग्लिश स्कूलचे स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न..



**खुलताबाद
(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

खुलताबाद शहरातील अपॉस्टोलिक फेथ किड्स गार्डन इंग्लिश स्कूलच्या वार्षिक स्नेहसंमेलनाचा रंगतदार सोहळा मंगळवारी रात्री शाळेच्या प्रांगणात मोठ्या उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांनी नृत्य, गीते, नाटके आणि विविध कलाकृती सादर करत उपस्थित रसिकांची मने जिंकली. हिंदी,मराठी तसेच विनोदी गीतांवर सादरीकरण करत विद्यार्थ्यांनी आपले सुप्त कलागुण प्रभावीपणे सादर केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खुलताबाद न्यायालयाच्या प्रथम महिला न्यायाधीश मसिरा शेख उपस्थित होत्या त्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून या स्नेहसंमेलनाचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून माजी नगराध्यक्षा लताताई घोडके,भद्रा मारुती देवस्थानचे अध्यक्ष मिट्ठू पाटील बारगळ,माजी उपनगराध्यक्ष नवनाथ बारगळ,कृषि अधिकारी दिनकर जाधव,आदर्श नर्सिंगचे मंगेश नाईक, पशुवैद्यकिय अधिकारी डॉ. प्रदीप मोराळे,माजी उपसभापती युवराज ठेंगडे, पत्रकार हुसेन पटेल, सविता पोळके, तसेच लंडनहुन आलेले विशेष शिक्षक सायमन पेटॉन आणि प्रसिद्ध लेखिका आमेना गाझी, प्रा. गणी पटेल, युवा नेते ऋषिकेश बोडखे, साईनाथ जाधव, रवी भालेराव आदी मान्यवर उपस्थित होते या सर्वांचे सत्कार शाळेच्या वतीने शाळेचे अध्यक्ष अजय चिमणे आणि सचिव राजश्री चिमणे यांनी केले. विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाने रसिकांची दाद मिळवली-विद्यार्थ्यांनी विविध संकल्पनांवर आधारित नृत्य, देशभक्तिपर गीते, पारंपरिक नृत्य, लावणी आणि झांशीची राणी या ऐतिहासिक प्रसंगाचे नाट्यरूप सादर करत प्रेक्षकांची वाहवा मिळवली. विशेषतः फेस्टिवल सॉन्ग वर आधारित सादरीकरणाने संपूर्ण कार्यक्रमात उत्साहाची लहर उमटली. तर लाडकी बहिणीवर आधारित नाटीकेने सर्व प्रेक्षकांना हसण्यास भाग पाडले. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या प्रभावी देखाव्यांनी प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले.शाळेचे संस्थापक अजय चिमणे व सचिव राजश्री चिमणे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी आपल्या सादरीकरणाने उपस्थित पालक,शिक्षक आणि मान्यवरांना मंत्रमुग्ध केले.पालकांनी ही या कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. स्नेहसंमेलनाच्या यशस्वी आयोजना बद्दल संपूर्ण शाळा परिवाराचे कौतुक करण्यात येत आहे.सूत्र संचालन बुशरा पटेल, प्रगती बारगळ,पुजा ठाकुर, विधी थेटे, तनुष्का हार्दे यांनी केले तर आभार श्रीहरी जाधव यांनी मानले.

या कार्यक्रमासाठी मुख्याध्यापक शहजान तांबोळी, संदेश खेरे,अशोक बारगळ,शिक्षिका ज्योती केरे,संगीता नागे, उज्वला खेरे.वैशाली शिंदे, उज्वला राजपुत, पल्लवी घोडके, कांचन खत्री,दिशा पवार, संतोष बारगळ, शिवाजी फुलारे. यांचे सह आदींनी परिश्रम घेतले.

## अटल बांबू समृद्धी योजना : दुष्काळी भागातील शेतकऱ्यांसाठी वरदान!

हवामान बदलाच्या वाढत्या परिणामांना तोंड देताना, शाश्वत शेती आणि पर्यावरणपूरक विकास आवश्यक आहे. याच उद्देशाने 'अटल बांबू समृद्धी योजना' केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी योजनांपैकी एक ठरली आहे. या योजनेच्या प्रभावी अंमलबजावण्यासाठी सरकारच्या वतीने बांबू लागवडीसाठी शेतकऱ्यांना रोपे मोफत किंवा सवलतीच्या दरात उपलब्ध करून दिली जातात. लागवड आणि देखभालीसाठी अनुदान व हवामान बदलाचा सामना करण्यासाठी पर्यावरणपूरक उपायांचा अवलंब करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत, प्रशिक्षण आणि मार्गदर्शन दिले जात आहे..

उत्पन्न व पर्यावरण संवर्धन दुहेरी लाभ या माध्यमातून मिळत असल्याने महाराष्ट्र सरकारने पुढाकार घेऊन शेतकऱ्यांसाठी विविध स्वरूपात अनुदान उपलब्ध करून दिले आहे.

यात बांबू लागवडीसाठी प्रत्येक रोपट्याच्या देखभालीसाठी ३५० रुपये खर्च अपेक्षित आहे, ज्यापैकी ५०% म्हणजेच १७५ रुपये अनुदान म्हणून दिले जाते. पहिले वर्ष ९० रुपये प्रति रोपटे, दुसरे वर्ष ५० रुपये प्रति रोपटे, तिसरे वर्ष ३५ रुपये प्रति रोपटे अनुदान मिळत आहे..

**बांबू लागवड योजनेचे नियम व अटी –**
– केवळ महाराष्ट्र राज्यातील शेतकऱ्यांनाच योजनेचा लाभ दिला जाईल.
– आवश्यक कागदपत्रे– आधार कार्ड, राशन कार्ड, रहिवाशी प्रमाणपत्र, मोबाईल नंबर, ई-मेल आयडी, पासपोर्ट साईज फोटो

**बँक खात्याची माहिती –** शेतकऱ्यांनी अर्ज करण्यासाठी महाराष्ट्र बांबू विकास मंडळ हेल्पडेस्क ईमेल :- mahabamboo@mahaforest.gov.in. या संकेतस्थळावर जाऊन आपला अर्ज करावा. या योजनेचा जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, नम्र विनंती!



**जिंतूर – मा. आमदार विजय भांबळे साहेब यांचे कट्टर समर्थक शाहेद भैय्या सिद्दिकी जिल्हाध्यक्ष परभणी राष्ट्रवादी युवक काँग्रेस (सोशल मीडिया) यांचे तर्फे जिंतूर शहराचे युवकांचे बैठक करण्यात आली या बैठकीत राष्ट्रवादी युवक काँग्रेस सोशल मीडियाचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. हा बैठक राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार भवन येलदरी रोड जिंतूर येथे होती.**

## श्री ऑल इंडिया श्वेतांबर स्थांकवासी जैन कॉन्फरन्स नवी दिल्ली येथे श्री मिठालाल कांकरिया यांची राष्ट्रीय सचिवपदी नियुक्ती

**छत्रपती संभाजीनगर
(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

श्री ऑल इंडिया श्वेतांबर स्थांकवासी जैन कॉन्फरन्स नवी दिल्ली येथे श्री मिठालाल कांकरिया यांची राष्ट्रीय सचिव पदी नियुक्ती करण्यात आली

छत्रपती संभाजी नगर श्री ऑल इंडिया श्वेतांबर स्थानकवासी जैन कॉन्फ्रेंस नई दिल्ली यांचे निवडणूक सुरू असून महाराष्ट्र मध्ये छत्रपती संभाजी नगर तर्फे मिठालाल कांकरिया यांची राष्ट्रीय कार्यकारणी मध्ये राष्ट्रीय सचिव पदी नियुक्ती करण्यात आली आहे.



ही संस्था श्रमण संघ ची १२० वर्षे जुनी मातृसंस्था आहे या संस्थेमध्ये साधू संतांची सेवा, साधु संतांची विहार, आगामी चातुर्मास करिता संस्था आहे, या संस्थेमध्ये छत्रपती संभाजीनगर तर्फे श्री मिठालाल कांकरिया श्री ऑल इंडिया श्वेताबर स्थानकवासी जैन कॉन्फ्रेंस नईदिल्ली में छ.संभाजीनगर संघ चे श्रीमान मिठालाल कांकरिया याचा राष्ट्रिय सचिव पद नियुक्ती करण्यात आली आहे यांना श्रमण संघीय आचार्य भगवंत प.पु. श्री शिव मुनिजी म.सा. , युवाचार्य भगवंत प .पु.श्री. महेंद्र ऋषिजी म.सा. , प.पु.श्री प्रबुद्ध मुनिजी म.सा. यांच्या आशीर्वादाने व राष्ट्रीय अध्यक्ष श्री अतुलजी जैन यांच्या मार्गदर्शनाखाली , माजी राष्ट्रीय अध्यक्ष श्री अविनाशजी चोरड़िया, माजी अध्यक्ष श्री पारस जी मोदी, राष्ट्रीय माजी महामंत्री पिंटू भाऊ कर्णावट, राष्ट्रीय माजी उपाध्यक्ष तनसुख झाबड़ , कॉन्फ्रेंस के राष्ट्रीय चेयरमैन श्री कांतीकुमार जैन, महाराष्ट्र के माजी अध्यक्ष श्री मदनलालजी लोढ़ा, यांचे मार्गदर्शनने व विनोद बोकड़िया,रोहित छाजेड़ , हितेश कांकरिया, रवि लोढ़ा, योगेश रुणवाल, स्वपनिल पारख, संतोष बोरा, अजिंक्य शिंगवी पियुष कासलीवाल नरेंद्र अजमेरा एवं श्री ऑल इंडिया श्वेतांबर स्थानकवासी जैन कॉन्फ्रेंस छ. संभाजीनगर जिल्हा तर्फे इतर पदाधिकारी, परिवार, मित्र परिवार , नातेवाईकानी शुभेच्छा दिल्या.

पान १ वरून

## अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याकडून पंतप्रधानांची प्रशंसा

ऊर्जा करारावर सहमती

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ऊर्जा करारावर कराराची घोषणा केली. ते म्हणाले की, पंतप्रधान मोदी आणि मी ऊर्जेबाबत एक महत्त्वाचा करार केला आहे. ज्यामुळे अमेरिका भारताला तेल आणि नैसर्गिक वायूचा आघाडीचा पुरवठादार बनेल.

दहशतवादाविरुद्ध एकत्र काम करू

अमेरिकेतील खलिस्तानी फुटीरतावाद्यांसह भारताविरुद्ध काम करणाऱ्या घटकांबद्दल अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प म्हणाले की, मला वाटत नाही की भारताचे बायडेन प्रशासनाशी चांगले संबंध होते. भारत आणि बायडेन प्रशासनामध्ये बऱ्याच गोष्टी घडल्या,ज्या फारशा निष्पक्ष नव्हत्या.

आम्ही एका अतिशय हिंसक व्यक्तीला (तहव्वुर राणा) ताबडतोब भारतात परत पाठवत आहोत. आम्ही गुन्हेगारीवर भारतासोबत काम करतो आणि आम्हाला ते भारतासाठी चांगले बनवायचे आहे.

लॉस एंजेलिस आणि बोस्टनमध्ये वाणिज्य दूतावास उघडणार

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, भारतात राहणारा भारतीय समुदाय हा आपल्या संबंधांमधील एक महत्त्वाचा दुवा आहे. आमच्या लोकांमधील संबंध वाढवण्यासाठी आम्ही लवकरच लॉस एंजेलिस आणि बोस्टन येथे आमचे वाणिज्य दूतावास उघडणार आहोत.

आम्ही अमेरिकन विद्यापीठांना भारतात ऑफशोअर कॅम्पस उघडण्यासाठी आमंत्रित केले आहे.

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक , प्रकाशक - श्री. **रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५ ए , सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर , सिडको, औरंगाबाद (महा.) - ४३१००५ येथे छापून शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७, सिडको पोलीस स्टेशन जवळ, औरंगाबाद (महा.)- ४३१००३ येथे प्रसिध्द केले.

**• संपादक : रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • **RNI No. MAHMAR/2023/87816**

This Daily Printed, Published and Owned by **RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** Printed at Mansi Printers, Plot No. 45 A, Service Industry Sector, Aurangabad (M.S.)- 431005 and Published at Shop No. 3, Keshardeep Complex, N-7, Near Cidco Police Station, Aurangabad (M.S.)- 431003

**• Editor : RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • **RNI No. MAHMAR/2023/87816**